# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक २३/०५/२०२१ (रविवार )

**—: चोरी (कंपनीचे स्क्रॅप)—**

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— अंतर्गत बलराज इंडस्ट्री एमआयडीसी बोरी येथे कंपनी चे आत मध्ये दरवाजा नसलेल्या बाथरूम मध्ये ठेवलेले एल्यूमिनीअम चे कॉईल ठेवलेल्या मालापैकी ५० बंडल वजन अंदाजे १५० कि. ग्रॅ. किमती १६५००/—रू चा माल अज्ञात इसमांनी दिनांक १९/०५/२१ ते २१/०५/२१ चे दरम्यान चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी रितेष मोहनलाल तरोने, वय ३१ वर्ष.रा. खापरी जि. नागपूर चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोहवा दयाराम करपाते मो. ९४३५६८५०९१ हे करीत आहे.

**—: चोरी ( मोटार सायकल ) :—**

पो.स्टे.सावनेर :— अंतर्गत १२ किमी अंतरावरी वार्ड क्र १ शिवाजी चौंक पाटणसावंगी निवासी फारूक लतिफभइ शेख वय ५३ वर्ष रा. वार्ड क्. १ शिवाजी चौंक पाटणसावंगी यांनी आपली होंडा कंपनीची यूनिकार्न मोटार सायकल क्र.एमएच ४० बी डब्ल्यू ८५४३ काळया रंगाची घरासमोर उभी करून ठेवली असता अज्ञात इसमांनी चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी फारूक लतिफभइ शेख वय ५३ वर्ष रा. वार्ड क्. १ शिवाजी चौंक पाटणसावंगी चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. सावनेर येथे कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पो. हवा. संदीप नागरे मो.क्र. ९०११५ ९६५०० हे करीत आहे.

**—: पळवून नेणे :—**

पो.स्टे.सावनेर :— दिनांक २२/०५/२०२१ रोजी पोलीस स्टेशन सावनेर ला येवून फिर्यादी यांनी आपली रिपोर्ट नोंदविली की, फिर्यादीची १६ वर्षीय **अल्पवयीन भाचीला** अज्ञात आरोपीने फुस लावुन फिर्यादीचे चे कायदेशीर रखवालीतुन **पळवून नेले आहे.**

सदर प्रकरणी फिर्यादी चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. सावनेर येथे कलम ३६३ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सफौ अनिल तिवारी ९६८९८९१४८६ हे करीत आहे.

## —: अकस्मात मृत्यु :—

**पो.स्टे. जलालखेडा :—** अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील जलालखेडा वस्तीत राहणारे दिलीप गणपतराव पेठे वय ६२ वर्ष यांनी २२/०५/२०२१ चे १३/०० वा. सूमारास आपल्या राहत्या घराचे मागे असलेल्या आंब्याच्या झाडाला नायलॉन दारीने प्लास्टीक खूर्चीवर उभे राहून गळफास लावून आत्महत्या केली.

सदर प्रकरणी राहूल रमेशराव पेठे वय ४२ वर्ष रा. वार्ड क्र. ०१ जलालखेडा ता.नरखेड चे तोंडी रिपोर्ट रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जलालखेडा येथे कलम १७४ जा.फौ. दाखल करण्यात आले असून पुढील तपास पो.हवा संजय रिधोरकर ८००७६७१९८६ हे करीत आहे.

**पो.स्टे. पारशिवनी :—** अंतर्गत ११ कि.मी. अंतरावरील सकरला येथील निवासी वसंता दामाजी वासनिक चा मुलगा प्रतिक वसंता वासनिक वय २३ रा. सकरला हा दिनांक २१/०५/२१ चे रात्री २२/०० वा. जेवण करून आपल्या रूममध्ये झोपण्याकरिता गेला. वसंता दामाजी वासनिक यांनी दिनांक २२/०५/२१ चे सकाळी ०५/३० मुलाचे रूमकडे गेले असता मुलगा प्रतिक वासनिक हा रूममध्ये नायलॉनच्या रस्सीने सल्पचे लोखंडी हुकला गळफास लावलेला दिसला.

सदर प्रकरणी फिर्यादी वसंता दामाजी वासनिक वय ४९ वर्ष रा. सकरला चे तोडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जा.फौ. दाखल करण्यात आले असून पुढील तपास नापोशि. रोशन काळे मो. क्र.७४४७५ ७१७२७ हे करीत आहे.

**पो.स्टे. नरखेड :—** अंतर्गत मौजा भदाडे मोहगाव येथे राहणारे अतुल परसराम गीरडकर,वय २८ वर्ष,रा. मोहगाव भदाडे यांनी दिनांक दि. ०५/०५/२१ चे साय.०५/३० वा. चा सुमारास अज्ञात कारणावरून फवारणी करण्याचे विषारी औषध प्राशन केल्याने त्यास प्रथमोपचार कामी ग्रामीण रुग्णालय सावनेर नेले येथे त्यांचेवर उपचार करून रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर वार्ड क्र. २४ तीकीट क्र. २२८८०६५ दि. ५/०५/२१ चे रात्री २०/०० वा.भर्ती करण्यात आले उपचार दरम्यान दि.०९/०५/२१ चे २२/०० वा. वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषींत केले.

पोहवा विकास बेलसरे,ब.नं,१५९१ मेडीकल नागपुर यांचे तर्फे दिनांक २२/०५/२०२१ रोजी पोलीस स्टेशनला प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम १७४ जा.फौ. दाखल करण्यात आले असून पुढील तपास पोहवा धनराज भुक्ते पोस्टे नरखेड हे करीत आहे

**पो.स्टे. नरखेड :—** अंतर्गत मौजा मोवाड येथे राहणारे भापेश भावराव हिरूडकर,वय २२ वर्ष,रा.मोवाड दि. १०/०५/२१ चे सकाळी ११/३० वा. चे सुमारास **अज्ञात कारणावरून शेतातील फवारणी करण्याचे विषारी औषध प्राशन केल्याने** त्यास प्रथमोपचार कामी ग्रामीण रुग्णालय मोवाड नेले येथे त्याचेवर उपचार करून त्यास रेफर केल्याने मेओ रुग्णालय नागपुर दि.१०/०५/२१ चे रात्री १४/३० वा. आय.सी.यु.भर्ती करण्यात आले. उपचार दरम्यान दि.११/०५/२१ चे ०६/३० वा. वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषीत केले.

सदर प्रकरणातील संबधीत कागदपत्रे पोहवा/१५०२ निवुत्ती यावले  मेओ पोलीस बुथ यांचे तर्फे दिनांक २२/०५/२०२१ रोजी  पोलीस स्टेशनला प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम १७४ जा. फौ. दाखल करण्यात आले असून पुढील तपास पोहवा साहेबराव मसराम मो.क्र. ९४२२५४७०५२ पोस्टे नरखेड हे करीत आहे

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**